# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण

**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. शिससं/उशि/पुवि/२०१९-२०/महाडीबीटी/ 2798 दिनांक : ७.१०.२०१९

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.

४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.

**विषय : - उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत...**

संदर्भ : - मा. शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१८/डीबीटी/१३५६९ दि. ०७.१०.२०१९.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, राज्य शासनाच्या विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून महाडीबीटी पोर्टल विकसित करण्यात आलेले आहे. सन २०१९-२० करीता महाडीबीटी पोर्टलवरुन शिष्यवृत्ती योजनांसाठी पात्र विद्यार्थ्यांकडून पासून ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. यामध्ये उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे. याबाबतीत सर्व महाविद्यालय, संस्था, विद्यापीठांना वारंवार परिपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

**तरी संदर्भिय पत्रानुसार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने भरण्याची अंतिम मुदत दि. १०.१०.२०१९ असून, पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी शक्य तितक्या लवकर अर्ज भरणेसाठी कळविण्यात येत आहे. त्याच बरोबर सदर अर्जाची महाविद्यालयाच्या लिपीक व प्राचार्यांच्या लॉगीनवरुन पडताळणी करण्याची अंतिम मुदत दि. २३.१०.२०१९ आहे. सोबत संदर्भिय पत्राची प्रत सोबत जोडण्यात आली आहे. तसेच महाविद्यालय स्तरावर अर्ज प्रलंबित राहिल्यामुळे एकही शिष्यवृत्तीपात्र विद्यार्थी वंचित राहिल्यास सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य/विद्यापीठांचे कुलसचिव यांची राहील याची नोंद घ्यावी.**

सोबत –संदर्भिय पत्राची प्रत.

(डॉ. विजय नारखेडे)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१

web: www.dhepune.gov.in Mail: schol.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/शिष्य-२०१८/डीबीटी/ 13569 दि. ०७/१०/२०१९

- 7 OCT 2019

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण.

**विषय :- उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करणे बाबत...**

**संदर्भ :-** १. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१०११४,दि. ३०.०७.२०१९
२. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१०२०७,दि. ३१.०७.२०१९
३. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१०६९५,दि. ९.०८.२०१९
४. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१०८०२,दि. २०.०८.२०१९

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्यशासनाच्या शिष्यवृत्ती योजनांची डीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे. याबाबत डीबीटी पोर्टलवर व्हिडीओ, मॅन्युअल उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. तसेच संदर्भिय संचालनालयाच्या पत्रान्वये लेखी सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि सद्यस्थितीत शिष्यवृत्तीसाठी प्राप्त अर्जांची संख्या ही पात्र विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात खूप कमी असल्याचे निदर्शनास येत आहे. सदरची बाब ही अत्यंत गंभीर आहे. तरी **विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने भरण्याची अंतिम मुदत दि. १०.१०.२०१९ असून, पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी शक्य तितक्या लवकर अर्ज भरणेसाठी कळविण्यात यावे.**

तसेच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळण्यासाठी डीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जाची शैक्षणिक संस्था तसेच विभागीय स्तरावरील प्रलंबित कार्यवाही त्वरीत पूर्ण करणेबाबत वारंवार लेखी तसेच बैठकांमध्ये सूचना देऊनही सद्यस्थितीत अनेक विद्यार्थ्यांचे अर्ज संस्था तसेच विभाग स्तरावर प्रलंबित राहील्याचे दिसून येत आहे.

सदर अर्जाची महाविद्यालयाच्या लिपीक व प्राचार्य यांच्या लॉगीनवरुन पडताळणी करण्याची **अंतिम मुदत दि. २३.१०.२०१९** अशी असून, महाविद्यालयांनी फॉरवर्ड केलेले शिष्यवृत्ती अर्जांची विभागीय सहसंचालक कार्यालयाच्या लॉगीनवरुन पडताळणी करण्याची **अंतिम मुदत दि. ३१.१०.२०१९** अशी आहे. तरी कोणत्याही परिस्थितीत महाविद्यालय तसेच विभाग स्तरावरील लॉगीनवर शिष्यवृत्ती अर्ज पडताळणीसाठी प्रलंबित राहणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.

संचालनालयाच्या संदर्भिय पत्रान्वये कळविल्यानुसार, आपल्या विभागामधील विद्यापीठे / महाविद्यालय / संस्था यांना त्यांचे डीबीटी प्रोफाईल अद्ययावत करुन, अभ्यासक्रमाचे शुल्कास संबंधित विभागीय सहसंचालक कार्यालय / बीएड अभ्यासक्रमाबाबत शिक्षण शुल्क समिती / विधी अभ्यासक्रमाबाबत FRA यांचेकडून मान्यता घेण्याबाबतची कार्यवाही पूर्ण झालेली असल्याबाबतचा पूर्तता अहवाल त्वरीत संचालनालयास सादर करावा.

तसेच आपल्या विभागामधील शिष्यवृत्तीबाबतची माहिती न मिळाल्यामुळे, महाविद्यालय / विभाग स्तरावर अर्ज प्रलंबित राहील्यामुळे एकही शिष्यवृत्तीपात्र विद्यार्थी वंचित राहील्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य/ विद्यापीठांचे कुलसचिव/ संबंधित विभागीय सहसंचालक यांची राहील. याची नोंद घ्यावी.

**(डॉ. धनराज माने)**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत :- १. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे यांना कार्यवाहीसाठी.
३. प्राचार्य, सर्व शासकीय, अनुदानित, विनाअनुदानित- कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना कार्यवाहीसाठी.